महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

# पक्षीमित्र

■ वर्ष आठवे ■ अंक १ ला ■ संपादक : दिगंबर गाडगीळ ■ १ ऑक्टोबर २०१७ पाने-१६

### संपादकीय

## विस्तारलेले क्षितीज

तब्बल ११३ वर्षे न दिसल्याने नामशेष झाला असे वाटणारा वनपिंगळा अकस्मात धुळे जिल्ह्यातील तोरणमाळ येथे प्रगट होतो काय अन् नाही तो नामशेष झालेला नाही अशी ग्वाही देतो काय ? पक्षीप्रेमींना हा सुखद असा धक्का होता. कदाचित् मोजक्या क्षेत्रावर असणारा व आजच्यासारखे भरपूर पक्षीनिरीक्षण न होणाऱ्या काळात तो न दिसल्याने तशी परिस्थिती झाली असावी. पण तोरणमाळ पाठोपाठ तो यावल अभयारण्यात दिसू लागला. तसे पाहिले तर काहीसे सलग क्षेत्र असल्याने तो तिथे दिसला असावा असे वाटत असतानाच तो डांगमध्ये दिसला. हे काही सलग क्षेत्र नाही. तो मध्य प्रदेशातही दिसला आहे.

त्या पाठोपाठ तो तानसा अभयारण्यात दिसल्याच्या बातम्या आल्या. त्यानंतर अगदी अलीकडे तो नाशिक जिल्ह्यातील हरसूल येथे वारंवार दिसला. कशाचे लक्षण आहे हे ? त्याचा क्षेत्रविस्तार होत असल्याचे हे लक्षण आहे.

अशा तऱ्हेने तो क्षेत्रविस्तार करणार असेल तर त्याला महाराष्ट्राचा राज्यपक्षी करण्याची वेळ आली आहे, असे म्हणावे लागेल. ज्याच्या वाढीसाठी कोणतेही खास प्रयत्न केले नसता तो वाढतो आहे, विस्तारतो आहे, हे त्याचे आत्मिक सामर्थ्य म्हटले पाहिजे. तेव्हा त्याला दाद देण्यासाठी आपण एवढे तरी करू शकतो. ठाणे येथे होणाऱ्या आगामी संमेलनात ही मागणी केली पाहिजे असे मला वाटते. तुम्हालाही तसे वाटत असल्यास कराच तशी मागणी.

– दिगंबर गाडगीळ

३९, आनंदवन कॉलनी, ऑफ कॉलेज रोड, नाशिक – ४२२००५

स्थिरभाष : (०२५३)२५७७९६८, चलभाष : ९८८१०७९७११, *E-mail : dgadgil09@gmail.com*

**पक्षीमित्रच्या संदर्भातील पत्रव्यवहार, लेख संपादकांकडे पाठवावा. प्रशासकीय बाबींबद्दल मात्र चिपळूणच्या पत्त्यावर लिहावे.**

## अध्यक्षीय

महाराष्ट्र पक्षीमित्र संस्थेच्या सभासदांच्या संख्येने एक हजारचा टप्पा पार पाडला आहे. आता एक हजार सहा सभासदांची नोंद संस्थेच्या दप्तरी आहे.

आपण आपल्या पक्षीमित्र त्रैमासिकात अधिक मोठ्या प्रमाणात लिखाण करावे. तसेच विविध पक्षी अभ्यास, संरक्षण याबाबत लिहायला हवे; जेणेकरून प्रत्येक जण अंक अधिक वाचतील व माहितीपूर्ण होईल.

संस्थेचे महाराष्ट्रभरचे संघटन अधिक घट्ट व्हावे यासाठी महाराष्ट्रभर चिमण्यांची घरटी, नवोदितांसाठी प्राथमिक पुस्तक, इत्यादी उपक्रम मोठ्या प्रमाणात राबवायला हवेत. याबाबत आपल्या कल्पना अवश्य कळवा, आपण त्या यशस्वी करू.

– भाऊ काटदरे

९३७३६१०८१७

**टीप : हा अंक आपल्या मित्रांपर्यंत पोहचवा, ते सभासद होतील !**

# पक्षी निरीक्षण आणि काव्य

पक्षी निरीक्षणाचा आणि कवितेचा काही संबंध असतो का? पक्ष्यांचे विविध रंग, त्यांचे आकाशात उडणे, त्यांचे डौलदार रूप, त्यांचे गाणे आणि या सर्वांना विणीच्या हंगामात आलेला बहर हे निरखून कोणाला काव्य सुचले तर आश्चर्य वाटायला नको. पण १९ व्या शतकातील अमेरिकेतील प्रसिद्ध निसर्ग अभ्यासक आणि विचारवंत जोन बरोज यांच्या मते सर्व पक्षी निरीक्षक हे कवीच असतात. काही हे काव्य शब्दात बद्ध करतात तर काही निरीक्षणातूनच काव्य जगतात.

जोन बरोज यांनी आपल्या १८७७ साली प्रकाशित झालेल्या 'बर्डस अँड पोएट्स' या लेखात लिहीले आहे - 'All the great ornithologists- original namers and biographers of the birds- have been poets in deed if not in words.'

यामुळेच तर बहिणाबाईंना सुगरणीचा खोपा (घरटे) पाहून काव्य करण्याची स्फूर्ती येते. त्र्यंबक बापूजी ठोंबरे उर्फ बालकवी पारव्याला एकांती घुमताना पाहून त्यावर काव्य करतात. अशी अनेक उदाहरणे अनेक भाषातील देता येतील. पण या सर्वांवर कडी केली ती वोल्ट व्हीटमन या १९ व्या शतकातीलच कवीने. वोल्ट व्हीटमन यांनी १८५९ साली ''आउट ऑफ द क्रेडल ऐंडलेसली रोकिंग'' ही कविता प्रसिद्ध केली. त्या कवितेत वोल्ट व्हीटमन यांनी ते अमेरिकेतील लाँग आयलंडला भेट दिल्यावर त्यांना त्याच्या बालपणातील त्याच समुद्र किनाऱ्यावर ते लहान असताना मॉकिंगबर्ड नावाच्या पक्षाच्या घरट्याचे त्यांनी कसे निरीक्षण केले हे आठवते.

लहान असताना एका मध्यरात्री चंद्राच्या प्रकाशात ते समुद्र किनारी येतात. त्यावेळी त्यांना तेथे मॉकिंगबर्ड पक्ष्याचे घरटे दिसते आणि त्या पक्ष्यांना कळू न देता ते त्या पक्षांचे निरीक्षण करू लागतात.

"Two feathered guests from Alabama, two together,
And their nest, and four light-green eggs spotted with brown,
And every day the he-bird to and fro near at hand,
And everyday the she-bird crouched on her nest, silent with bright eyes,
And every day I, a curious boy, never too close, never disturbing them,
Cautiously peering, absorbing, translating."

या कवितेतील लहान मुलगा अगदी आधुनिक पक्षी निरीक्षकासारख्या वागताना दिसतो. पक्ष्यांच्या जास्त जवळ न जाता, त्यांना त्रास न देता तो निरीक्षणे करतो. घरट्यातील अंडी कोणत्या रंगाची आहेत त्यावर कोणते ठिपके आहेत हे सुद्धा तो पाहतो.

पण एक दिवस अचानक एक दुर्घटना होते. पक्ष्याच्या घरट्यात मादी दिसत नाही.

"Till of a sudden,
May be killed, unknown to her mate,
One forenoon the she-bird crouched not on the nest,
Nor return'd that afternoon, nor the next,
Nor ever appear again."

आणि मग नर पक्षी एकटाच रात्रंदिवस साद देत बसतो.

"Here I am here!
With this just-sustain'd note I announce myself to you,
This gentle call is for you my love, for you."

आणि येथून ही कविता वेगळे वळण घेते. कवी पक्ष्याच्या रूपात स्वत:ला पाहू लागतो.

ही कविता १८५९ साली लिहिली आहे हे लक्षात घेतले तर कवीची निरीक्षण दृष्टी किती तीक्ष्ण असावी याची प्रचिती येते. कवीने केलेले मॉकिंगबर्ड पक्ष्याच्या अंड्याचे वर्णन तसेच एक जोडीदार निघून गेल्यानंतर दुसरा रात्रीसुद्धा साद घालतो ही बाब नंतरच्या शास्त्रीय निरीक्षणांनी सिद्ध केली. म्हणूनच जॉन बरोज जे म्हणतो ते खरे असावे की प्रत्येक पक्षी निरीक्षकात एक कवी दडलेला असतो.

- राजकमल जोब
(rajkamaljob@yahoo.co.uk)

# ३०० वर्षांचा पक्षीविषयक डाटाबेस



द. आशियातील पक्षीशास्त्रविषयक लेखनाची सुरुवात झाली १७१३ मध्ये. म्हणजे ३०० वर्षांपूर्वी. या काळात प्रसिद्ध झालेल्या पक्षीविषयक लेखनाचा धांडोळा घेण्यासाठी श्री. आशिष पित्ती यांनी Journal of the Asiatic Society of Bengal चे १६० खंड, Stray Features चे १२ खंड, Journal of Bombay Natural History Society चे ११२ खंड, Ibis चे १५९ खंड, Newsletter for Birdwathchers चे ५६ खंड, Indian Birds चे १३ खंड आणि Forktail चे ३१ खंड यांचे परिशीलन करून प्रचंड डाटाबेस तयार केला आहे. त्यासाठी त्यांनी मुंबई आणि कोलकाताच्या ग्रंथसंग्रहालयांमध्ये दिवसच्या दिवस डोळेफोड केली आहे. त्याशिवाय या विषयावाची २१०७ पुस्तके पाहिली आहेत. हे अफाट काम करूनही ते स्वत:ला हौशी म्हणवून घेतात, हा त्यांचा विनय म्हटला पाहिजे. २००५ पासून ते हैद्राबाद येथून Indian Birds ह्या नियतकालिकाचे संपादन व प्रकाशन करत आहेत.

या संदर्भात BNHS चे भूतपूर्व डायरेक्टर असद रहमाजी म्हणतात, ''त्यांनी जमवलेल्या संदर्भावरून संरक्षण-संवर्धन-अभ्यासूला पक्ष्यांच्या पूर्वीच्या व आताच्या परिस्थितीची तुलना करून भारतीय उपखंडातील संरक्षण-संवर्धन उपाययोजनांची आखणी करता येइल.''

पक्षीविषयक अशी कामगिरी कारणाऱ्या श्री. आशिष पित्तींना 'पक्षीमित्र' चा सलाम!

# पक्ष्यांच्या नंदनवनात

निसर्ग ही खरंच एक अद्‌भुत शक्ती आहे ! मनुष्यप्राण्यापासून अजस्र प्राण्यापर्यंत आणि वनस्पती-वृक्षांपासून पक्ष्यांपर्यंत साऱ्यांना जीवनदान देणारा तो संजीवनी-स्रोतच आहे ! नटण्या-सजण्याची, आपले सौंदर्य खुलविण्याची त्यालाही जणू आवडच असावी. कधी धुक्याची ओढणी लपेटून, तर कधी हिमाच अवगुंठन घेऊन मिरवतो, तर कधी नानारंगी फुलांच्या, अन् कधी चिमखड्या पक्ष्यांच्या रूपानं अलंकारांचा साज चढवतो !

निसर्गाचं हे साजरं रूप 'दांडेली'च्या 'ॲडव्हेंचर कँप'मध्ये अमाप पक्ष्यांच्या दर्शनातून दिसतं, हे कळल्यावर त्या ठिकाणी जाण्याची ओढच वाटू लागली, आणि सुदैवानं तशी संधीही मिळाली.

'दांडेली' हा कर्नाटक राज्यात येणारा भाग. 'ॲडव्हेंचर कँप'मध्ये मुक्कामासाठी छोट्या तंबूवजा झोपड्या (Tent-huts) आहेत. तट्ट्यांनी बनविलेल्या असून त्यातील दारं-खिडक्या जाळीदार कापडाच्या आहेत. हट्ला जोडलेला टॉयलेट ब्लॉक् तेवढा सिमेंटचा आहे. हट्च्या ओटावजा बाल्कनीत खुर्च्या टाकून बसणं, ही एक चैन होती! कारण हट्कडे येणारी पायवाट ओलांडली की, झाडावेलींच्या जाळ्यांची गर्दी, आणि त्यांच्यामधून दिसणारा त्याला लागूनच वाहणारा 'काळी' नदीचा प्रवाह यांचं मनोहर दर्शन होत असे.

या नदीच्या पृष्ठभागावरून दुधासारख्या शुभ्र बगळ्यांच्या रांगांमागून रांगा 'V' अक्षरासारखे नानाविध आकार करीत उडत जात, त्यावरून नजर हलत नसे. दुपारच्या वेळी मारुतीरायांचे असंख्य वंशज समोरच्या जाळीतील वेलींवर चढून आपल्या चिमण्या बछड्यांपासून ते थेट आजोबांपर्यंतच्या सर्व पिढ्यांसह जाळीवर लटकत. वेलींची कोवळी पानं, कळ्या, आणि कर्ण्याच्या आकाराची आकर्षक फुलं या सगळ्यांचा अधाशाप्रमाणे फन्ना उडवून टाकत.

सांजसावल्या परिसराला वेढू लागल्या की, पुन्हा बगळ्यांच्या रांगा आपल्या वसतिस्थानी परतू लागत. 'ब्राह्मिनी काईटस्'चे थवेही आपले पंख पसरून घिरट्या घालीत. या पसरलेल्या पंखांचा विटकरी रंग त्यांना एक आगळंच सौंदर्य बहाल करीत असे.

पक्षी-दर्शनासाठी पहाटे उठून जवळच्या जंगलात गेलो. आमचा मार्गदर्शक पक्षी अन् वृक्षांच्या बाबतीत निष्णात जाणकार होता. 'मलबार पाईड हॉर्नबिल्स्, टिटस्, ब्लॉसम्हेडेड पॅराकिटस्, कोतवाल, हार्ट-स्पॉटेड्, वुडपेकर, तांबट, मैना, मॅगपाय रॉबिन् या सर्वांचं दर्शन त्याने आम्हाला घडवलं. सौंदर्यमूर्ती भासणारे किंगफिशर आपला विशिष्ट आवाज काढीत अनेकदा जवळ येऊन गेले. या साऱ्या पक्ष्यांसाठी खास राखलेली उंच झाडांची ही राई पाहून कौतुक वाटत होतं.

जवळून वाहणाऱ्या 'काळी' नदीच्या पात्रात मासे पकडण्यासाठी सुळकन् झेप घेणारे किंगफिशर आणि मधूनच दर्शन देऊन झाडीत लपून केकारव ऐकविणारे मोरही मनाला आनंद देत होते.

रिझॉर्टच्या परिसरात फेरी मारतानाही 'भारद्वाज, सँड ग्राऊज्' यांसारखे दुर्मीळ पक्षी पाहण्याची सुवर्णसंधी मिळत होती.

'गणेश गुडी' हा इथला दुसरा रिझॉर्ट. येथे प्रवेश केल्यावर प्रथमदर्शनीच लक्ष वेधून घेणारा फलक सूचना देतो- Music Strictly Banned !

टी.व्ही., ट्रॉन्झिस्टर, लाऊड स्पीकर यांसारखे कशाचेच आवाज येथे ऐकू येत नाहीत. या ठिकाणी केवळ पक्ष्यांच्या कलरवालाच 'परवानगी', नव्हे, मुक्तद्वार आहे !

पक्ष्यांसाठी ठेवलेल्या छोट्या छोट्या पसरट भांड्यात पाणी होते. ते पिण्यासाठी नानाविध पक्षी येत होते.

'एमरल्ड डोव्ह, रेड व्हिस्कर्ड बुलबुल, रॅकेट-टेल्ड ड्रॉन्गो, पॅरडाईज् फ्लायकॅचर, शामा, मलबार पॅरट्, मलबार व्हिसलिंग थ्रश्, यलो-स्पॉटेड पिजन्, इंडियन स्किमिटर बॅबलर, रोझ फिंच' अशा कितीतरी पक्ष्यांची ओळख आमच्या मार्गदर्शकाने करून दिली. सामान्य कोतवाल पक्षी आपण बऱ्याच ठिकाणी पाहतो. पण येथे दिसला, तो रॅकेटच्या आकाराची शेपटी असलेला कोतवाल - 'रॅकेट टेल्ड् ड्रॅन्गो'.

तसंच, कोकीळ आणि बुलबुल यांच्या गोड आवाजाशीच आपला परिचय. पण या ठिकाणी 'हिल् मैनेच्या' मधुर आवाजानं अक्षरश: मोहिनीच घातली, आणि सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास 'सिंगिंग थ्रश्'च्या गोड भूपाळीनं तर अधिकच जादू केली. फक्त पहाटेच्या वेळीच कूजन करणाऱ्या या पक्ष्याला म्हणूनच स्थानिक लोकांनी 'Wakening call' हे अभिधान दिलं असावं !

इथूनच पुढे 'सुपा' धरणाच्या परिसरातील पुलावरून 'पॉण्ड् हेरॉन्स्, हॉर्न्-बिल्स्, भारद्वाज, स्वॉलो, पाईड वॅगटेल' अशा अनेक पक्ष्यांना बारकाईनं पाहता आलं. थव्याने उडणाऱ्या, पाकोळ्यांसारख्या स्वॉलोज सतत भिरभिरत होत्या. यांचा रंग करडा पण पंख पसरताच दिसणारा शुभ्र रंग व त्याला असलेली झालरीसारखी दिसणारी काळसर किनार, केवळ प्रेक्षणीय !

निसर्गाचा एक विरोधाभास म्हणता येईल, असं दृश्य, म्हणजे-आपल्या पिलाला भरवणारी प्रेमळ हॉर्नबिल् मादी, आणि कोंबडी-ससा वगैरेंच्या पिलांना भक्ष्य म्हणून सहज उचलून नेणारा 'शिक्रा' हा शिकारी पक्षीही याच परिसरानं दाखवला, आणि 'जीवो जीवस्य जीवनम्' हे सत्य अधोरेखित केलं !

प्रत्येक पक्षीमित्राने अवश्य भेट द्यावी, असा हा परिसर !

– सौ.नीलिमा शशिकांत नाडकर्णी
(मुंबई. फोन – २४३०९५४४)

## १८ वे विदर्भ पक्षिमित्र संमेलन

यवतमाळ येथे ८-९-१० डिसेंबर रोजी होणार आहे.

संपर्क : श्री. श्याम जोशी. फोन – ९९६०१५६८८६

# कॉर्बेट अभयारण्यातील नाचण

उत्तरांचल राज्यातील जिम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यानाला जाण्याची संधी मला मिळाली. अतिशय उत्सुकतेने, उत्साहाने, अलौकिक निसर्गाचे दर्शन होईल या आशेने रामनगरपर्यंत पोहोचलो. निवासाची व्यवस्था लागल्यानंतर सायंकाळी ४ वाजता बाहेर पडलो. मुख्य डांबरी रस्ता सोडून एका बाजूला जाणारी कच्ची पायवाट धरली. त्या वाटेवरून पुढे चढ लागला. पुढे प्राचीन मंदिराचा फलक होता. त्या मंदिराच्या परिसरात पक्षीनिरीक्षण करावे असे ठरवून आम्ही पुढे सरकलो. रस्त्यावरील रहदारीचे आवाज दूर होत गेले. दाट अरण्यातील निसर्गाचे आवाज आता स्पष्ट ऐकू येत होते. वेगळ्या जगात गेल्यासारखे वाटत होते.

पुढे दाट झाडीत अदमासे १०० मीटर अंतरावर वाळलेल्या पानांवर काहीतरी श्वापद असल्याचे जाणवले. एका ठिकाणी स्थिर होऊन त्या आवाजाकडे बारकाईने पहात काहीतरी दिसेल म्हणून बराच वेळ थांबलो. कदाचित तो चितळाचा छोटा कळप असावा. आमच्या पावलांच्या आवाजाने व हालचालींमुळे ते सर्व खाली दरीत पसार झाले. पुढे जात असताना एक वेगळा आवाज ऐकू आला. अपरिचित होता. बराच वेळ त्या आवाजाच्या दिशेने पहात त्या हालचालींचे निरीक्षण करत वेळ गेला. शेवटी त्या पक्ष्याचे दर्शन झाले. तो 'ग्रीन मॅगपाई' पक्षी होता. मला तो नविनच होता. त्याचे फोटो काढता आले नाही याची खंत वाटली.

आता आम्ही मंदिरापर्यंत पोहोचलो होतो. आत प्रवेश करून दर्शन घेतले. त्यावेळी मोराचा टाहो ऐकू आला. जवळच होता. जवळच्या झाडीतून तो मोठा मोर बाहेर आल्यावर दिसला. मोहक नर होता. मंदिरात पेटत असलेल्या धुनीजवळील बसलेल्या साधूने सांगितले, हा येथे नेहमीच फिरतो. तसेच इतर जंगली जनावरांचा वावर नेहमी पहातो. आम्हाला काहीतरी नक्कीच दिसेल याची आम्हाला खात्री झाली.

आम्ही आजुबाजूला अतिशय बारकाईने प्रत्येक आवाज, हालचालींचे सूक्ष्म निरीक्षण, विश्लेषण करत पुढे निघालो. समोर धनेशाची एक जोडी एकमेकाला साद घालत मोठ्या उंच वृक्षावर उतरली. त्यांना दुर्बिणीतून पहात असताना त्या झाडाच्या एका उभ्या खोडावर हिमालयीन सुतार पक्षी आपल्या तीक्ष्ण चोचीने सालीखाली दडलेल्या कीटकांना टिपण्यात व्यस्त दिसला. पोपटांची छोटी टोळी त्या उंच झाडावरील फांद्यांवर दंगा करत होती. त्या उतरणीवरून दुर्बिणीतून सर्व दिसत होते. निसर्गाचे ते विलक्षण रूप आम्ही अनुभवत होतो. आत्मिक समाधान वाटत होते.

त्या डोंगरावरून खाली दरीत छोटा नाला दिसत होता. ती पायवाट त्या दिशेने जात होती. आम्ही डोंगर उतरण्यास सुरुवात केली. वाटेत अनेक प्रकारची फुलपाखरे दिसली. आम्ही पावले हळू टाकत सांभाळून उतरलो. तो नाला मोठा व अरूंद होता. पाणी अगदीच कमी होते. ठिकठिकाणी छोटी-मोठी डबकी तयार झाली होती. दगडगोटे, वाळूत पावले टाकत आम्ही नाल्यातून पुढे गेलो. बाजूच्या झुडुपाच्या जाळीत ऐटबाज 'फॅनटेल'चे दर्शन झाले. छातीवर पांढरे ठिपके किंवा पोट पांढरे नव्हते. काळ्या रंगाची ती उत्तरेकडील हिमालयीन प्रजाती होती. उभी ताणलेली शेपूट, पंख्याप्रमाणे पसरवून आजूबाजूला हलवत, एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर उड्या मारत त्याचे नृत्य सुरू होते. एका ठिकाणी झाडाच्या खोडाला टेकून मी कॅमेरा स्थिर केला. त्याच्या लकबी मला माहीत असल्याने त्याचे उत्तम फोटो काढण्यासाठी चांगली संधी होती. ज्या ठिकाणी तो पुन्हा पुन्हा येउन बसत होता त्या ठिकाणी झूम करून कॅमेऱ्याची लेन्स फोकस केली. ज्या वेळी तो बसायचा त्या वेळी शटर बटण दाबून त्याचे चांगले फोटो मला टिपता आले. स्थिर चित्रणावर समाधान न मानता त्याचे चलचित्रण सुरू केले.

प्रकाश कमी होत होता. वातावरणात गारवा वाढत होता. मला त्या फॅनटेलचे फोटो मिळाले खरे, परंतु हा खटाटोप करत असताना वेळेचे, परिस्थितीचे भान नव्हते. माझ्या सोबतीला असलेल्या माझ्या पत्नीला अत्यंत असुरक्षित वाटत होते. परंतु माझी जिद्द पाहून विरोध करण्याचे तिला धाडस होत नव्हते. समोरच्या रस्त्याने दोन स्थानिक ग्रामस्थ लांबून येताना दिसले. त्यांनी लांबूनच इशारा करत वर येण्यास सांगितले. त्या फॅनटेलला सोडून नाल्यातून आम्ही वर रस्त्याला आलो. त्यांनी आम्हाला जरा फटकारलेच. जरी हे ठिकाण डांबरी रस्त्यापासून काही अंतर दूर असले तरी येथील स्थानिक लोक सूर्यास्तानंतर या नाल्यात जा-ये करत नाहीत. या नाल्यात जाण्याचे धाडस करत नाही. कारण तेथे वाघाचा वावर असतो. परवाच येथून खालच्या बाजूला अर्धा कि.मी. अंतरावर वाघाने एक घोडा मारला होता. वाघाने एकदा मोठी शिकार केली तर तो एकाच वेळी संपवत नाही ती लपवून ठेवतो. टप्याटप्याने तो खातो. हे ऐकून माझ्या अंगावर काटे उभे राहिले. म्हणजे आम्ही त्या नाल्यात सायंकाळी सूर्यास्ताच्या नंतर निर्भीडपणे फोटोग्राफी करताना किती मोठी जोखीम घेतली होती, याची खरी कल्पना जाणवली. अशा जोखमींची वास्तविकता आता प्रथमच अनुभवली. आजपर्यंत अनेक अभयारण्यात, जंगलात, अनोळखी परिसरात ट्रेकिंग, भटकंती केली, ताडोबा व्याघ्र अभयारण्यातील सायंकाळी पौर्णिमेच्या चंद्रप्रकाशात काही वर्षापूर्वी छोट्या १०-१२ च्या चमूत फिरत असताना दुरून येणाऱ्या वाघाच्या डरकाळ्यांचा थरार अनुभवला होता. परंतु त्या दिवसाचा आम्हाला आलेला अनुभव मात्र वेगळाच होता, तो कायम स्मरणात राहील.

माझ्या हाती जिम कॉर्बेटची जंगलकथेची पुस्तके लागली असता मला त्या परिसराचे खरे चित्र अनुभवायला मिळाले होते. तेथील जीवनाची वास्तविकता जिवंत दिसली होती. १९०७ साली म्हणजे तब्बल ११० वर्षापूर्वी या ब्रिटिश अधिकाऱ्याने अनुभवलेले निसर्गाचे वर्णन, शिकारकथा या पुस्तकात आहेत. त्या केवळ शिकारकथा, साहसकथा, किंवा जंगलकथा नसून जंगलवासी, वनवासी, स्थानिक ग्रामस्थांच्या जीवनात शिरून घेतलेला अविस्मरणीय असा फेरफटका आहे. त्यांच्या पुस्तकाचे वाचन केल्यावर त्यांनी अनुभवलेल्या निसर्गात

*पान ११ वर...*

# महाराष्ट्रातील अभयारण्ये आणि भारतीय प्रदेशनिष्ठ पक्षी

जैविक आणि सांस्कृतिक विविधतेच्या बाबतीत भारत देश अग्रेसर आहे. किंबहुना तीच भारताची ताकद आहे. इथली एकूण भौगोलिक स्थिती, पर्जन्य आणि हवामान हे अशा विविधतेच्या मुळाशी आहे. उत्तरेला बर्फाच्छादित हिमालय, उत्तर पूर्वेला घनदाट जंगले, उत्तर पश्चिमेला वैराण वाळवंट तर देशाच्या तीनही बाजूंना समुद्र. अशा वैविध्यपूर्ण परिसंस्थांमुळे येथे आढळणारी जैवविविधता तशीच वैशिष्ट्यपूर्ण आहे. महाराष्ट्रातही परिसंस्थांची विविधता दिसते. गवताळ, राने, सदाहरित जंगले, पानगळीची वने, खारफुटीची जंगले, आणि विस्तीर्ण समुद्रकिनारा अशा एकंदर विविधतेमुळे येथे असे काही वन्यजीव आढळतात जे जगात इतरत्र कुठेही आढळत नाही. ज्याना प्रदेशनिष्ठ जाती (endemic species) म्हटले जाते, उदाहरणार्थ, आशियाई सिंह फक्त भारतात, गुजरातच्या गीरमध्ये आढळतात, जगात इतरत्र कुठेही नाही. अशा प्रदेशनिष्ठ जाती असणे हे त्या-त्या प्रदेशाचे भूषणच आहे.

महाराष्ट्रात, विशेषकरून सह्याद्रीमध्ये अशा जाती आढळतात. वन्यजीवांमध्ये पक्षी हा एक असा गट आहे ज्यावर आजपर्यंत जास्तीत जास्त संशोधन झालेले दिसते. भारतात साधारणपणे ७९ प्रदेशनिष्ठ (Indian endemic) पक्षी दिसतात. ते निरनिराळ्या प्रकारच्या अधिवासांमध्ये आढळून येतात. संरक्षित आणि राखीव अशा दोन्ही प्रकारच्या वनांमध्ये (Protected and Reserve Forests) असे पक्षी दिसून येतात. संरक्षित वनात, म्हणजेच अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्यानात (Sanctuaries and National Parks) यापैकी बव्हंशी प्रदेशनिष्ठ जाती जाती दिसून येतात. यातील काही पक्षी बहुतेक सर्व ठिकाणी आढळणारे आहेत तर काही पक्षी ठराविक क्षेत्रातच आणि कमी संख्येने आढळून येतात. प्रत्येक प्रजातीचे विचरण क्षेत्र / सुस्थान (niche) ठरलेले असते ज्यानुसार त्यांचा आढळ ठरतो. विचरण क्षेत्रात त्या प्रजातीला लागणारे अन्न, निवारा, घरट्यासाठीची जागा अशा गोष्टींचा समावेश होतो. कोणत्याही दोन प्रजातींचे विचरण क्षेत्र तंतोतंत सारखे कधीच नसते. ज्यामुळे आंतर-प्रजातीय संघर्ष (inter-species conflict) आंत:प्रजातीय संघर्षापेक्षा (intra-species conflict) तुलनेने कमी असतो.

भारतातील अति-संकटग्रस्त (Critically Endangered) गटात मोडणारे सर्वात दुर्मीळ असे घुबड म्हणजे 'वन पिंगळा' (Forest Owlet).

मेळघाटच्या संरक्षित जंगलात याची संख्या बरी आहे. याशिवाय, तोरणमाळ, यावल अभयारण्य आणि नुकतेच ते पश्चिम घाटातील तानसा अभायरण्यातही आढळून आलेले आहे. गेली कित्येक दशके वन पिंगळा हा फक्त सातपुड्याच्या जंगलातच आढळतो अशी धारणा होती. वन पिंगळा हा पुनर्शोधात सापडलेला (rediscovered) पक्षी आहे. १८७२ साली सर्वात पहिल्यांदा विज्ञानात नोंदल्या गेलेल्या या पिंगळ्याच्या १८८४ पर्यंत विविध ठिकाणाहून नोंदी सापडतात. पण त्यानंतर जणू ते इतिहासात गडप झाले. बऱ्याच शोधयात्रा होत राहिल्या पण हा पिंगळा काही केला सापडला नाही. शेवटी १९९७ साली हा पक्षी एका अमेरिकन पक्षीसंशोधक गटाला नंदुरबारमधील तोरणमाळच्या क्षेत्रात सापडला, तब्बल ११३ वर्षांच्या अंतराने! आज वन पिंगळा महाराष्ट्राबाहेर मध्यप्रदेश आणि गुजरातमध्ये आढळून येतो.

महाराष्ट्रात आढळणारे आणखी एक प्रदेशनिष्ठ घुबड म्हणजे चट्टेरी घुबड (Mottled Wood Owl) हे घनदाट ते विरळ अशा विविध प्रकारच्या जंगलामध्ये दिसून येते. उत्तरेत तानसा अभयारण्य, कर्नाळा पक्षी अभयारण्य, भीमाशंकर अभयारण्य, फणसाड अभयारण्य, कोयना-चांदोली, राधानगरी अभयारण्य अशा पश्चिम घाटातील सर्वच अभयारण्यात चट्टेरी घुबड आढळून येते. याशिवाय, विदर्भातील नागझिरा, नवेगाव बांध, खानदेशातील यावल अभयारण्य, मेळघाट, ताडोबा, पेंच या ठिकाणीही या पक्ष्यांची नोंद आहे. इतकेच नाही तर सोलापुरातील कोरडे हवामान असलेल्या नान्नज अभयारण्याच्या आसपासच्या काटेरी वनातसुद्धा चट्टेरी घुबड दिसून येते. याचा वैशिष्ट्यपूर्ण असा आवाज जंगलात चट्कन लक्ष वेधून घेतो.

नान्नज अभयारण्य ज्या माळढोक पक्ष्यासाठी (Great Indian Bustard)प्रसिद्ध आहे... खरंतर होते असंच म्हणाव लागेल... तो माळढोकही भारतीय उपखंडातील प्रदेशनिष्ठ पक्षीच आहे. गुजरातच्या पश्चिम सीमेला जोडून असलेला पाकिस्तानचा काही भाग सोडला तर माळढोक फक्त भारतातच आढळतो. त्याची सर्वात जास्त संख्या आज राजस्थानात आहे. एके काळी नान्नज त्यासाठी प्रसिद्ध होते. काही वर्षांपूर्वीपर्यंत एका दिवसामध्ये ५ ते १० माळढोक या अभयारण्यात दिसल्याच्या नोंदी आहेत. दुर्देवाने आज अख्ख्या नान्नज अभयारण्यात फक्त दोनच माळढोकची नोंद आहे. स्थानिक लोकांची या पक्ष्याप्रतीची अनास्था, प्रशासनाला वेळ गेल्यावर आलेली जाग आणि या पक्ष्याचा तथाकथित अभ्यासकांनी स्व-प्रसिद्धीसाठी केलेला उपयोग या सर्व गोष्टी आजच्या अवस्थेला जबाबदार आहेत. याच नान्नजमधील माळढोक संवर्धनाचे काम (?) दाखवून काहींनी आंतराष्ट्रीय प्रकल्प/पुरस्कारसुद्धा मिळवला. संवर्धनाच्या नावाखाली पुरस्कार मिळवणे हा दोन-चार संस्थांना मॅनेज करण्याचाच सोपस्कार बनून राहिला आहे. हे जोपर्यंत असे होत आहे तोपर्यंत कुठल्याही वन्यजीवाचे खऱ्या अर्थाने संवर्धन होण्याची सुतराम शक्यता नाही.

कोंबडी कुळातील काही प्रदेशनिष्ठ पक्षी महाराष्ट्रात आढळतात. यामध्ये, खडक लावरी (Rock Bush Quail) रंगीत चाकोत्री (Painted Spurfowl), लाल चाकोत्री (Red Spurfowl) आणि राखी रानकोंबडी (Grey Junglefowl) असे चार प्रकारचे पक्षी आहेत. यातील राखी रानकोंबडी मुख्यत्वे पश्चिम घाटातील अभयारण्ये आणि इतर वनात दिसून येते. विदर्भातील ताडोबासारख्या संरक्षित क्षेत्रातही राखी रानकोंबडी आढळते. पश्चिम घाटाच्या पूर्व भागात नगर जिल्ह्यातील कळसुबाई-

पान ६ वर...

पान ५ वरून...

हरिश्चंद्रगड अभयारण्यात राखी रानकोंबडी दिसून येते लाल चाकोत्री पश्चिम घाट सातपुडा आणि पूर्व घाटामधील पर्वतीय पानगळी वनामध्ये (Decidous hill forest) वास करते. पश्चिम घाटातील भीमाशंकरच्या अभयारण्यात लाल चाकोत्री विपुल प्रमाणात दिसत असे. सर्रास शिकारीमुळे तिच्या संख्येत घट झाली आहे. नायलॉनच्या धाग्याचा साधा फास बनवून त्यात चाकोत्री पकडली जाते. भीमाशंकरच्या दाट जंगलात फिरताना असे फासे जागोजाग आढळून येतात. रंगीत चाकोत्री पश्चिम घाटात आढळून येत नाही. ती मुख्यत्वे खडकाळ आणि कोरड्या हवामानाच्या अशा मराठवाडा आणि विदर्भातील वनात दिसून येते. वर्ध्यातील बोरचे अभयारण्य आणि नागपुरातील उमरेड-कऱ्हाड अभयारण्य याशिवाय ताडोबा मेळघाट या क्षेत्रात रंगीत चाकोत्री वास्तव्य करते. खडक लावरी महाराष्ट्रातील जवळ जवळ सर्वच क्षेत्रात आढळते. काटेरी आणि खडकाळ अशा वनात राहणे ती पसंत करते. नागझिरा, नान्नज, मयुरेश्वर, ताम्हिणी अशा कितीतरी अभयारण्यात खडक लावरी दिसून येते. झुडूपी काटेरी वनात ती आढळत असल्याने अभयारण्यांच्या बाहेरच ती जास्त संख्येने दृष्टीस पडते.

प्रदेशनिष्ठ पक्ष्यांपैकी मलबारी चंडोल (Malabar Lark) आणि साईक्सचा चंडोल (Sykes's Lark) हे असे पक्षी आहेत जे फक्त गवताळ रानांमध्ये वास्तव्य करतात. तोच त्यांचा अधिवास आहे. काही बारकावे वगळता हे दोन पक्षी दिसायलाही अगदी एकसारखे आहेत. मलबारी चंडोल हा बव्हशी पश्चिम घाटातील पर्वतीय गवताळ रानात, ज्याला स्थानिक भाषेत 'सडा' म्हणतात, तेथे आढळतो. तानसा पासून हरिश्चंद्रगड, भीमाशंकर, कोयना ते दक्षिणेला राधानगरी अशा सगळ्या अभयारण्यात मलबारी चंडोल आढळतो. कासचे पठार, ताम्हिणी आणि पूर्वेला अगदी रेहकुरी अभयारण्यापर्यंत या पक्ष्यांच्या नोंदी आहेत. साईक्सचा चंडोल हा घाटाच्या पूर्वेकडील गवताळ रान, शेतीचे क्षेत्र अशा विस्तीर्ण प्रदेशात आढळून येतो. काही क्षेत्रात दोन्ही चंडोल एकत्रही आढळून येतात. हरिश्चंद्रगड, भीमाशंकर, तानसा, राधानगरी आणि विदर्भातील सर्वच अभयारण्यात साईक्सचा चंडोल सहजी दिसून येतो.

तांबट पक्ष्याच्या गटातील दोन प्रदेशनिष्ठ पक्षी महाराष्ट्रातील जंगलात आढळतात. त्यांपैकी अगदी सामान्यपणे दृष्टीस पडणारा म्हणजे छोटा कुटूर्गा (White-Cheeked Barbet) पश्चिम घाट आणि विदर्भातील जवळ जवळ सर्वच अभयारण्यात हा दिसून येतो. दिसून येतो म्हणण्यापेक्षा ऐकू येतो असे म्हणणे जास्त संयुक्तिक ठरेल याचे कारण म्हणजे हा पक्षी सतत ओरडत असतो आणि याचा आवाज सर्वदूर ऐकू येतो. जगलात गेल्यावर जो कुटूर-कुटूर असा सतत आवाज येत असतो तो याच पक्ष्याचा. या आवाजावरूनच त्याला कुटूर्गा असे नाव पडले आहे. दुसरा प्रदेशनिष्ठ तांबट हा तसा दुर्मीळपणे दृष्टीस पडणारा मलबारी तांबट (Malabar Barbet or Crimson-throated Barbet) हा अगदी ठराविकप्रकारच्याच घनदाट अशा जंगलात आढळून येतो. आकारानेही लहान असल्याने तसा सहजी कळून येत नाही. हा फक्त पश्चिम घाटातील उत्तरेला सातारा-पुणे पर्यंतच्याच अभयारण्यात दिसून येतो. महाबळेश्वर, कोयना, तिलारी अशा क्षेत्रातून मलबारी तांबटच्या नोंदी आहेत. हा पक्षी पश्चिम घाटातील सुद्धा विशिष्ट अशाच जंगलात का दिसतो यावर अधिक संशोधन होणे गरजेचे आहे.

शिंजीर पक्ष्याच्याही दोन जाती भारतासाठी प्रदेशनिष्ठ आहेत आणि ज्या महाराष्ट्रातही दिसून येतात. एक आकाराने बराच लहान असलेला छोटा शिंजीर (Crimson-backed sunbird or small sunbird) पश्चिम घाटात सर्वत्र दिसणारा असा हा शिंजीर, तानसापासून ते राधानगरी पर्यंतच्या सर्वच अभयारण्यात दिसून येतो. दुसरा आहे व्हीगर्सचा शिंजीर (Vigors's Sunbird) हा आकाराने थोडा मोठा आणि उठावदार रंग असलेला शिंजीर आहे. पश्चिम घाटातील सदाहरित जंगलामध्ये आढळून येतो. गोवा राज्याच्या सीमेपासून ते उत्तरेला गुजरातपर्यंत पश्चिम घाटाच्या पट्ट्यात हा शिंजीर दिसून येतो. कोकणात अगदी घराच्या आसपासही हा शिंजीर सहजी पाहायला मिळतो. शिंजीरासारखंच फुलातील मध खाणारा पण आकारने शिंजीरापेक्षाही लहान असलेला प्रदेशनिष्ठ पक्षी म्हणजे निलगिरी फुलटोचा (Nilgiri Flowerpecker). पहाडी वनांमध्ये आढळून येणारा हा फुलटोचा तानसा ते राधानगरी अशा पश्चिम घाटातील सर्वच अभयारण्यात दिसून येतो.

कबुतराच्या कुळातील एक प्रदेशनिष्ठ पक्षी आहे जो पश्चिम घाटातील दाट जंगलात दिसून येतो तो म्हणजे निलगिरी रानपारवा (Nilgiri Wood Pigeon). भीमाशंकर, कोयना, फणसाड, ताम्हिणी, राधानगरी अशा अभयारण्यातील घनदाट जंगलांमध्ये हा पक्षी आढळतो. पण क्वचितच दृष्टीस पडतो. स्वभावाने लाजरा असा रानपारवा जंगलालगतच्या फळबागांमध्ये फळा-फुलांवर ताव मारताना मात्र दिसून येतो. असाच सदाहरित जंगलात राहणारा आणखी एक प्रदेशनिष्ठ पक्षी म्हणजे मलबार पोपट (Malabar Parakeet) विशेषकरून पश्चिम घाटातील पहाडी क्षेत्रामध्ये याचे वास्तव्य असते. मात्र जेथे दिसतो तेथे मोठ्या संख्येने पाहायला मिळतो. तानसा, कर्नाळा, कोयना या संरक्षित क्षेत्रात मलबारी पोपट सहज दृष्टीस पडतो. भीमाशंकर अभयारण्यात काही ठराविक ठिकाणीच हा दिसून येतो.

शहरामध्ये सहजपणे पाहायला मिळणाऱ्या राखी धनेश (Common Grey hornbill) सारखा दिसणारा मलबारी राखी धनेश (Malabar Grey hornbill) हासुद्धा एक प्रदेशनिष्ठ पक्षी महाराष्ट्रात दृष्टीस पडतो. तानसा, कर्नाळा, भीमाशंकर, कोयना, राधानगरी अशा सर्वच अभयारण्यात हा धनेश दिसून येतो. याला घरटे बनवण्यासाठी मोठ्या झाडातील ढोल्यांची गरज असते. दुर्दैवाने जंगलामध्ये सर्रास चालत असलेल्या वृक्षतोडीमुळे या धनेशचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

छोट्या कुटूर्गा पक्ष्यासारखाच पश्चिम घाटात सर्वदूर पसरलेला प्रदेशनिष्ठ पक्षी म्हणजे मलबारी कस्तूर (Malabar Whistling Thrush). दिसायला देखणा असलेल्या या कस्तुरची शिटी ही सर्व पक्ष्यांमध्ये मधुर

पान ७ वर...

पान ६ वरून...

समजली जाते. पश्चिम घाटातील जंगलात फिरताना एखादा मनमौजी व्यक्तीच शिटी वाजवत चालला आहे असं वाटावं इतकं सुंदर हा कस्तूर गातो. सातपुड्याच्या जंगलातही मलबारी कस्तुरचे वास्तव्य आहे. पश्चिम घाटात उत्तरेतील पूर्णा अभयारण्यापासून सुरू होत दक्षिणेला तानसा, कर्नाळा, फणसाड, भीमाशंकर, कोयना, चांदोली, राधानगरी अशा सर्वच अभयारण्यात आणि अभयारण्याबाहेरही मलबारी कस्तूर मुबलक प्रमाणात दिसतो. सातपुड्याच्या मेळघाट, पेंचसह इतरही अभयारण्यात तो आढळून येतो. खळाळणाऱ्या झऱ्यांच्या जवळील खडकावर मलबारी कस्तूर आपले घरटे बनवतो. ठिकठिकाणी पाण्याचा उपसा करण्यासाठी बांध बांधले जातात, ज्यामुळे झरे आटत चालले आहेत, ज्याचा थेट परिणाम या मलबारी कस्तुरच्या प्रजननावर होत आहे.

सातभाई पक्ष्याच्या दोन प्रदेशनिष्ठ जाती महाराष्ट्रात दिसतात. एक म्हणजे बाकचोचीचा सातभाई (Indian Scimitar Babbler) सह्याद्री, सातपुडा, पूर्व घाट अशा सर्वच प्रदेशात या सातभाईचा आढळ आहे. पहाडी वन आणि झुडूपी वन अशा अधिवासात हा दिसून येतो. हा अधिवास असलेल्या बहुतेक सर्वच अभयारण्यात हा दृष्टीस पडतो. त्याचा आवाज अगदी दूरपर्यंत जात असल्याने जंगलात फिरताना याची चाहूल सहजच लागते. दुसरा सातभाई म्हणजे तांबूस सातभाई (Rufous babbler) हा फक्त पश्चिम घाटातच आढळून येतो. प्रामुख्याने जंगलांच्या काठावरील क्षेत्रात (Forest edges) आणि पुनर्वाढ झालेल्या (regrowth) वनात दिसून येतो. भीमाशंकर, कोयना, राधानगरी अभयारण्यात हा सातभाई असल्याच्या नोंदी आहेत.

याशिवाय, मलबारी साळुंखी (Malabar Starling), निळा माशीमार (White-bellied Blue flycatcher), जाड शेपटीचा वटवट्या (Broad-tailed grassbird) ठिपकेवाला नाचण (Spot-breasted fantail) आणि भारतीय टीट (Indian Tit) असे महाराष्ट्रात मिळणारे भारतीय प्रदेशनिष्ठ पक्षी आहेत. यांपैकी 'नाचण' आणि 'टीट' हे सहज दृष्टीस पडणारे पक्षी तर उरलेले तीन हे ठराविक अधिवासात दिसणारे आणि सहज दृष्टीस न पडणारे पक्षी आहेत. निळा माशीमार हा सदाहरित जंगलात आढळतो तर वटवट्याला गवताळ रान लागते. विशिष्ट अधिवास असलेल्या अभयारण्यातच हे पक्षी पाहायला मिळतात तर नाचण आणि टीट हे साधारणपणे सर्वच प्रकारच्या अभयारण्यात दिसून येतात.

अमुक एक प्रदेशनिष्ठ पक्षी अमुक एका अभयारण्यात मिळतो याचा अर्थ इतकाच की तो प्रामुख्याने त्या अभयारण्यात दिसतो. अर्थात अभयारण्याच्या बाहेरच्या जंगलातही हे पक्षी असणारच. अभयारण्य ही मानवी संकल्पना आहे. सलग जंगल जिकडे असेल तिकडे हे पक्षी जाणारच. खरंतर जंगलांची ही सलगताच जास्त महत्त्वाची आहे. म्हणूनच जितके महत्त्व अभयारण्यांचे आहे तितकेच महत्त्व त्यांना जोडणाऱ्या राखीव जंगलांचेही आहे. एखाद्या प्रजातीचा जनुकीय प्रवाह (gene flow) अखंड ठेवायचा असेल तर असे अभयारण्यांना जोडणारे दुवे (corridors) टिकवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

प्रदेशनिष्ठ पक्षी हे एका ठराविक ठिकाणावरच उत्क्रांत होत असल्याने त्यांचे महत्त्व अधिक आहे. अशा पक्ष्यांचे ठराविक परिसंस्थेतील अस्तित्व हे त्या-त्या परिसंस्थांचे महत्त्व अधोरेखित करते. शिवाय, हे पक्षी अशा परिसंस्थेच्या संस्थात्मक संरचनेतील (Systemic Structure) एक महत्त्वपूर्ण दुवा असतात. जसे या प्रदेशनिष्ठ पक्ष्यांचे अस्तित्व या परिसंस्थांमुळे आहे तसेच या परिसंस्थाही अशा जातींमुळे टिकून आहेत.

जैविक विविधतेचा एकूण प्रवाह (continuum)अशा संस्थात्मक परस्परावलंबनामुळेच (Systemic interdependence) टिकून आहे.

– धर्मराज पाटील

मो. ९८८११८६३९९

('निसर्ग सेवक'च्या सौजन्याने)

## हरवले ते गवसले

आपल्याकडचा वनपिंगळा नामशेष झाला आहे असे मानले जात असतानाच ७२ वर्षांनी सातपुड्याच्या जंगलात सापडला हे आपल्याला माहीत आहे. तसाच प्रकार व्हेनेझुएलामध्ये घडला. ताचिरा अँटापिट्टा हा पक्षी ६० वर्षांनी पुन्हा सापडला आहे. 'शोधा म्हणजे सापडेल' यावर विसंबून अमेरिकन बर्ड कॉन्झरव्हन्सी या संस्थेने Turquise-throated Puffleg, Common Kinglet Clyptura आणि Tachira Antpitta या ३ पक्ष्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न चालवला आहे, त्यातील हे पहिले यश!



जोनाथन मिरांडा यांनी घेतलेला पहिला फोटो

## अभिनंदन

नाशिक येथे झालेल्या किर्लोस्कर वसुंधरा चित्रपट महोत्सवात २३ ऑगस्ट रोजी भुसावळच्या चातक नेचर कॉन्झर्वेशन सोसायटीस 'पर्यावरण मित्र' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

# ३१ वे पक्षीमित्र संमेलन ठाण्याला

होप नेचर ट्रस्टच्या सहकार्याने ठाणे येथे ३१ वे पक्षीमित्र संमेलन २५-२६ नोव्हेंबर रोजी होत आहे. संमेलनाचा प्रमुख विषय आहे परिसरातील पक्षी - त्यांचा जीवनक्रम आणि सवयी. यापूर्वी ठाणे येथे १७ वे संमेलन श्री. माधवराव गोगटे यांच्या अध्यक्षतेखाली १९९६ मध्ये झाले होते.

सभासद शुल्क १५ नोव्हेंबर २०१७ पूर्वी भरल्यास ₹८००/- इतके असून त्यानंतर ते ₹१,००० इतके राहील. सामायिक निवास व्यवस्था फक्त १०० प्रतिनिधींकरता उपलब्ध असेल व त्यासाठी स्वतंत्र ₹२०० इतका आकार असेल.

काही निवडक प्रतिनिधींना टेक्निकल सेशनमध्ये संधी मिळू शकेल. त्या निवडीसाठी आपण सारांश फक्त ३०० शब्दांमध्ये इलेक्ट्रॉनिक फॉरमॅटमध्ये (एडिटेबल) पाठवावा. निवड झाल्यास तसे कळविण्यात येईल. अंतिम तारीख १५ ऑक्टोबर २०१७.

संमेलनानिमित्त एक स्मरणिका प्रसिद्ध होईल. त्यासाठी जास्तीत जास्त २,००० शब्दांपर्यंतचे लेख (फोटो-रेखाटनांसह) स्वीकारले जातील. निवडीचा हक्क संमेलन समितीकडे राहील. अंतिम तारीख १५ ऑक्टोबर २०१७. लेख सादरीकरण hopenaturetrust@gmail.com किंवा पोस्टाने - 'होप नेचर ट्रस्ट, सहयोग मंदिर, सहयोग मंदिर पथ, घंटाळी, ठाणे (पश्चिम) ४००६०२' येथे पाठवावीत.

सोबत नोंदणी अर्जाचा नमूना जोडला आहे.

## परिसरातील पक्षी - त्यांचा जीवनक्रम आणि सवयी

शनिवार २५ नोव्हेंबर आणि रविवार २६ नोव्हेंबर २०१७

### नोंदणी अर्ज

| | | |
|---|---|---|
| पहिले नाव : | मधले नाव : | आडनाव : |
| लिंग : | वय : | इ-मेल : |
| निवासाचा पत्ता (पिनकोडसह) : | | |
| मोबाइल / फोन नंबर (STD कोडसह) : | निवास व्यवस्था हवी आहे का ? (कृपया योग्य पर्यायावर टिक (✓) करावी.) ☐ होय ☐ नाही | |

सदस्य शुल्क भरल्याचे तपशील (RTGS / NEFT or Demand Draft / Cheque)

सदस्य शुल्क कशा प्रकारे भरले त्यावर टिक (✓) करावी. ☐ RTGS ☐ NEFT ☐ D.D.

For RTGS / NEFT Remittance - (कृपया आपला ट्रॅन्झॅक्शन नंबर न विसरता नमूद करावा.)

| बँकेचे नाव | ज्या खात्यातून पैसे पाठवले त्याचे नाव | पैसे पाठवल्याची तारीख | ट्रॅन्झॅक्शन नंबर |
|---|---|---|---|
| | | | |

For Remittance by DD / Cheque -

| DD / Cheque number | Date | Name of Bank and Branch |
|---|---|---|
| | | |

तुमच्या जवळच्या स्टेट बँकेच्या शाखेत तुम्ही चेक भरू शकता. कृपया स्लिप मेल करावी.

Information for remittance by RTGS / NEFT

| | | |
|---|---|---|
| A/c name: Hope Nature Trust | A/c No: 11100529711 | Type: Savings Bank |
| Bank Name: State Bank of India | Branch: Thane Main, Agyari Cross Lane, Mazda Complex, Jambhali Naka, Thane, Maharashtra 400601 | IFSC Code: SBIN0000489<br>MICR Code: 400002094 |

Information for remittance by DD / Cheque

| | |
|---|---|
| In favour of: Hope Nature Trust | Payable at: Thane |

सदस्याची स्वाक्षरी आणि तारीख

तुम्ही या फॉर्मची इमेज hopenaturetrust@gmail.com वर अपलोड करू शकता किंवा आपला प्रवेश अर्ज साध्या पोस्टाने सभासद शुल्कासह पुढील पत्त्यावर पाठवू शकता - होप नेचर ट्रस्ट, सहयोग मंदिर, सहयोग मंदिर पथ, घंटाळी, ठाणे (पश्चिम) ४००६०२

# सफर-सातपुडा टायगर रिझर्व्हची

ह्या वर्षी एप्रिल २०१७ मध्ये आम्ही 'सातपुडा' टायगर रिझर्व्हला कौटुंबिक सहल आयोजित केली होती. तिथे जाण्यासाठी तीन सबळ कारणे होती. एक म्हणजे तिथे दिवसाला फक्त २३ सफारी जीप जंगलात सोडण्यात येतात. त्यामुळे प्राणी जास्त दिसण्याची शक्यता असते. दुसरे मुख्य कारण म्हणजे तिथे 'Walking safari' नेली जाते. अशी सोय महाराष्ट्रातील कुठल्याच जंगलात नाही. तिसरे महत्त्वाचे कारण म्हणजे तिथे 'Night safari' ची सोय आहे. असा तिहेरी फायदा लक्षात आल्यामुळे आम्ही खूप उत्साहाने तयारी केली. हे अभयारण्य भोपाळपासून साडेतीन ते चार तासाच्या अंतरावर आहे.

भोपाळहून निघाल्यावर वाटेवरच भोजपूरचे मंदिर पाहिले. ते राजा भोज याने एक हजार वर्षांपूर्वी बांधले होते. आतील शिवलिंगाची उंची भारतातील सर्वांत जास्त म्हणजे ७५ फूट असून ते एका दगडात तयार केले आहे. अतिशय भव्य आकार पाहून आपण स्तिमित होतो. ह्याच रस्त्याने जाताना आपण 'कर्कवृत्ताची' रेषापण ओलांडतो. तिथे रस्त्यावरच एक चौथरा करून 'कर्कवृत्त' असे लिहिलेली रेघ आखलेली आहे. त्याच रस्त्याने पुढे गेल्यावर 'भीमबेटका'च्या जंगलातील गुहा दिसतात. तिथे गाईड (मार्गदर्शक) बरोबर नेणे चांगले. आदिमानवाने लाल व काळ्या नैसर्गिक रंगाने काढलेली प्राण्यांची व मानवाची सुंदर चित्रे गुहेतील भिंतीवर चितारली आहेत. तिथे ६०० गुहांमध्ये चित्रे आहेत, पण पर्यटकांना थोड्याच गुहांमध्ये प्रवेश करता येतो.

आम्ही चार ते साडे चार वाजता दुपारी मढई गावतील रिसॉर्टमध्ये पोहोचलो. आगाऊ आरक्षण असल्यामुळे लगेच खोल्या मिळाल्या. चहापाणी झाल्यावर उत्साहाने आसपास फेरफटका मारला. आमच्या रिसॉर्टपासून ५-१० मिनिटांच्या पायी अंतरावर नदी होती व एप्रिल महिन्यातसुद्धा बोटी चालविण्याइतके पाणी होते. नदीच्या पैलतीरावर जंगल सफारीची हद्द होती. जंगलात जाण्यासाठी रोज आम्हाला पायी चालत नदीकिनारी जाऊन बोट घ्यावी लागे व पैलतीरावर उतरून जंगलात जाण्यासाठी सफारी जीप घ्यावी लागे. नदीकडे जाताना रोजच आम्हाला नदीसुरय, टिटवी, खंड्या, वंचक इ. पाणपक्षी दर्शन देत असत.

ह्या जंगलाचा विस्तार खूप आहे पण त्यामानाने त्यात वाघांची संख्या कमी आहे. बिबट्यांची संख्या बरीच आहे. आम्ही फक्त वाघ बघायच्या उद्देशाने गेलो नव्हतोच. आम्हाला सर्व प्राणी, पक्षी व झाडाझुडपाचे निरीक्षण करायचे होते. तिथले तापमान ४२ ते ४३ अंश असायचे. सकाळी ९ वाजताच खूप तापायला सुरुवात व्हायची. झाडांची पाने झडल्यामुळे प्राणी व पक्षी नीट दिसायचे. आम्हाला चितळांचे व रानडुकरांचे भरपूर कळप दिसले. एकदा तर पूर्ण पिसारा फुलवून नाचणाऱ्या मोराचे नृत्य मनसोक्त पहायला मिळाले. त्याचे नृत्य लांडोरीसुद्धा खूपच उत्सुकतेने बघत होत्या. एक मोर आपला ऐटदार पिसारा घेऊन एका फांदीवर खूप वेळ बसला होता. ते दृष्यपण खूप आनंद देऊन गेले.

तिथे बिबट्यांची संख्या भरपूर असल्यामुळे की काय आम्हाला तीन वेगवेगळ्या बिबट्यांनी तीन सफारीत दर्शन दिले. पहिल्याच जीप सफारीत आमच्या जीपच्या पुढे पायवाटेवर निवांतपणे चालणारा पाठमोरा बिबट्या खूप वेळ पाहिला. दुसऱ्या एका जीप सफारीच्या वेळी एका खडकाच्या कपारीत डोंगरात बसलेला बिबट्या आम्ही व इतर जीपमधील पर्यटकांनी खूप वेळ बघितला. तिसरा बिबट्या आम्ही नाईट सफारीच्या ट्रीपमध्ये आमच्या जीपच्या पुढेच खूप वेळ शांतपणे चालताना न्याहाळला. नाईट सफारीची वेळ संध्याकाळी ५:३० ते ८:३० वाजेपर्यंत असते. त्या वेळी जीपमधील मार्गदर्शक सर्च लाईट टाकून आसपासचे जंगल सतत दाखवीत असतो. त्या प्रकाशझोतात आपल्याला प्राणी दिसतात.

आम्ही २ वेळा नाईट सफारी घेतली. पहिल्या नाईट सफारीत आम्हाला फक्त एका रानमांजराने दर्शन दिले. रानमांजर फार क्वचित दिसते. दिवसा ते दिसतच नाही. त्यामुळे आम्ही खूष झालो. दुसऱ्या नाईट सफारीच्या वेळी आम्हाला Civet cat हा एक दुर्मीळ प्राणी खूप वेळ दिसला. दुसऱ्या नाईट सफारीतच आम्हाला बिबट्या व भरपूर रानससे दिसले. ते खूप वेळ उड्या मारत पळत होते.

आम्ही जी 'Walking safari' घेतली होती त्यात १० वर्षाच्या आतील मुलांना जाता येत नाही. आमच्या सहल मार्गदर्शकाने आम्हाला याची कोणतीच आगाऊ कल्पना दिली नव्हती. माझा नातू ८ वर्षांचा असल्यामुळे आयत्या वेळी त्याला जंगलात जायची परवानगी नाकारण्यात आली. त्यामुळे तो व त्याच्या सोबतीला मी हॉटेलवर थांबलो. दोघेही थोडे नाराज झालो. पण उपाय काय? मग नदीकाठीच थोडा वेळ पक्षीदर्शन केले.

ह्या जंगलात रानकोंबडे, रानकोंबड्या प्रचंड संख्येने आहेत. आम्हाला त्यांचे खूप दर्शन झाले. आवाज तर सतत यायचे. तो खरंतर खूप लाजरा पक्षी पण आम्हाला खूप बघायला मिळाले. तिथे एक दुर्मीळ घटना बघायला मिळाली. दिवसा 'रातवा' पक्षी बघायला मिळणे व दिसणे खूपच अवघड असते, पण आमच्या मार्गदर्शकाने आम्हाला ४-५ फुटांवर असलेला जमिनीवर बसलेला रातवा दाखविला. पण आम्हाला नीट दिसायला व ओळखायला १० मिनिटे लागली ! कारण त्याची सरूपता आणखी विशेष म्हणजे त्याने अंडे घातले होते व ते पोटाखाली उबवायला न ठेवता जमिनीवरच मोकळे ठेवले होते. कारण तेथील तापमानच ते अंडे उबवणार !


जंगलातील सगळ्यात ताकदवान गवा आम्ही अनेक वेळा पाहिला. त्याचे कळप पाहिले. त्याचा काळा तुकतुकीत रंग, पीळदार स्नायू, बाकदार व बळकट शिंगे व पायमोजे घालण्यासारखे पाय सगळ्यांना आकर्षित करतात व बघताच त्याची ताकद लक्षात येते आणि त्याच्या थंड नजरेनेच आपण गारद होतो. एकदा आम्ही दोन पूर्ण वाढ झालेले नर

पान ११ वर...

# दुर्लक्षितांचे धनी

मराठा समाजातील सर्व जाती काळाच्या मुख्य प्रवाहात टिकून राहण्यासाठी एकत्र आल्या. दुर्दैवाने पक्ष्यांच्या जगात असे घडू नाही शकत. त्यांना स्वत:ला वाचविण्यासाठी एकत्र येणे जमणार नाही. पक्षीजगात मोठे वा आकर्षक पक्षीच आपले लक्ष वेधून घेतात. त्यांच्या अधिवासावर होण्याऱ्या आक्रमणामुळे त्यांच्यातील लुप्त होण्याऱ्या प्रजातींनाच काही पक्षीप्रेमी व पर्यावरणामध्ये कार्यरत संस्थांच्या प्रयत्नामुळे शासनाचा राजाश्रय मिळतो. पण छोटे, अनाकर्षक पक्षी किंबहुना सगळीकडे आढळणारे पक्षी दुर्लक्षितच राहतात. पर्यायाने त्यांचा धोक्यात येणारा अधिवाससुद्धा विरल होत जातो. त्यात चंडोल (अलाउडीडी) (लार्क) कुळातील पक्ष्यांचा कदाचित प्रथम क्रमांक लागेल. त्यांच्याकडे लक्ष न जाण्याचे मुख्य कारण त्यांचा छोटा आकार, भुरकट मातकट रंग हा आहे. पण त्यांच्या काही लकबी, विणीच्या हंगामातील करामती लक्षात घेतल्या तर आपण त्यांना सहज ओळखू शकू.

सर्वात प्रथम मोठ्या प्रमाणात आढळणारा चिमण चंडोल (Ashy crown sparrow lark) बद्दल जाणून घेऊया. हा बसकट आकाराचा चिमणीपेक्षा लहान असतो. मादीचा रंग सरसकट वाळूसारखा तपाकिरी तर नर खालून पूर्णपणे काळा. रंगाने पूर्णपणे जमिनीशी समरस असल्याने ते सहसा दिसून येत नाहीत पण विणीच्या हंगामात मादीसाठी गाणे म्हणत हवेतील करामती दाखविताना हा सहज ओळखू येतो. हवेत २५ मीटरपेक्षा उंच एखाद्या रॉकेटसारखा वर जातो व पंख मिटून खाली सूर मारतो. जमिनीजवळ आल्यावर परत आपल्या वेगाचा फायदा घेऊन तो परत उलटा थेट वर जातो. तेथून पुन्हा सूर मारतो. प्रत्येक सूर मारण्याच्या वेळी आपल्या छोट्या लकेऱ्या लांब स्वरामध्ये सी ई ई ई.. ई. ई. असे गाणे गातो. उघड्या माळरानावर, नापीक प्रदेशात हा जोडीने दिसून येतो. तुरेबाज चंडोल (Sykes lark) मात्र ६–७ च्या समूहाने दिसतो. आकाराने चिमणीएवढा, भुरकट, मातकट रंगाचा हा पक्षी आपला डोक्यावरचा तुरा डौलाने मिरवतो. त्याच्या अजूबाजूच्या सर्व पक्ष्यांची नक्कल हा हुबेहूब करू शकतो. प्रजनन काळात (जुलै ते सप्टेंबर) आकाशात १०० मीटरपेक्षा वर जाऊन पंखांची अखंड उघडझाप करत सलग १० ते २० मिनिटे गाणे गाण्याची कला या जातीत आहे. लालपंखी चंडोल (Indian bushlark) आपल्या विमान स्टाईलसाठी प्रसिद्ध आहे. प्रजनन काळात गाण्याच्या स्वरातील चढ–उतार करीत हा आकाशातून खाली उतरताना पंख विस्तारून अगदी स्थिर ठेवून विमानासारखा जमिनीवर उतरतो. आकाराने चिमणीएवढा, डोक्यावर, छातीवर काळे ठिपके व पंखावर लाल भागाने हा ओळखू येतो. छोट्या बुंध्यावर, तारेवर बसून याचे मादीसाठी अखंड गायन चालू असते. चंडोल कुळामध्ये गवई चंडोल (Singing bushlark) हा गायनासाठी प्रसिद्ध आहे. तसा तो नावाने सर्वांना परिचित आहे. पण तितकाच दुर्मीळसुद्धा आहे. असतो तो लालपंखी चंडोल सारखाच पण डोक्यावर, छातीवर काळे ठिपके नसतात. बुंध्यावर बसून किंवा आकाशात विहार करताना याचे मादीसाठी अखंड गायन चालू असते. त्याचे गाणे कधी तुटकपणे तर कधी मंजुळ शीळ वाजवल्यासारखे वाटते. विणीच्या हंगामात जून ते सप्टेंबरमध्येच याची हजेरी जाणवते. बाकी वर्षभर तो भूमिगत असल्यागत गायब असतो. चंडोल कुळातील सर्वात वेगळा पक्षी म्हणून गोरली चंडोल (Rufous tailed lark) ओळखला जातो. चिमणीपेक्षा मोठा, गडद तांबूस



रंगाचा व जाड चोचीचा हा चंडोल सहसा दगडी माळरानावर दिसून येतो. जमिनीवर हा कधी इकडे तर कधी तिकडे असा झीग–झॅग स्टाईलने खाद्य टिपताना दिसून येतो. गोरली चंडोलचे गाणे अगदी आनंददायी असते. ते प्रश्नोत्तराच्या स्वरूपात गायले जाते. एका माथ्यावर नर बसून गातो तर दुसऱ्या माथ्यावरून मादी त्याला प्रतिसाद देते. हे झाले स्थानिक रहिवासी. या कुळातील काही परदेशी पाहुणे विदर्भात हिवाळी पाहुणचारासाठी अफगाणिस्तान, बलुचिस्तान येथून येतात. आखूड बोटांचा चंडोल (Greater short-toed lark) ची नोव्हेंबर ते मार्च महिन्यात सर्वच तलावांच्या काठी हजेरी दिसून येते. हुबेहूब चिमणीसारख्या दिसण्याऱ्या या जातीचा थवा १० पासून ४०० पर्यंतच्या संख्येत आढळून आला आहे. तळ्याच्या काठी बारीक आवाजात चिवचिवाट करत गवतातल्या बिया टिपताना हे नेहमीच दिसून येतात. एखाद्या वर्षी त्यांच्या थव्यामध्ये ह्यूम्स चा चंडोल हा परदेशी पाहुणासुद्धा आपली हजेरी लावून जातो. अशा या चंडोल कुळातील विविध जाती आपल्या आजुबाजूने वावरत असूनही दुर्लक्षित राहतात. त्यांची ओळख पटवून संपूर्ण शास्त्रीय अभ्यास करणे गरजेचे आहे. म्हणजे त्यांना भेडसावण्याऱ्या प्रश्नांची आपल्याला कल्पना येऊ शकेल. माळरान, मोकळे मैदान, नापीक प्रदेश हे चंडोल जातीचे घरट्यासाठी व उदरभरणासाठी हक्काचे अधिवास. पण 'निरूपयोगी जमीन' अशा सरकारी नामकरणाखाली झालेल्या शोषणाने माळरानाचे तीन तेरा केले आहेत. अनिर्बंध कारखानदारी त्यापाठी आलेल शहरीकरण, विकास योजना यासाठी जमिनीची गरज भासू लागली व त्यासाठी माळरान, नापीक जमीनीला लक्ष करण्यात आले. परिणामी मोठ्या प्रमाणात शहराभोवतालची माळराने संपून तिथे सीमेंटचे जंगल व कारखाने उभे राहिले. ज्या पक्ष्यांच्या जाती आपल्या घराच्या आजुबाजूने दिसायच्या त्यांना पाहण्यासाठी १५–२० किलोमीटर दूर जावे लागते. याचा अर्थ काय तर मोठ्या प्रमाणात दिसण्याऱ्या जाती आता विरळ होत चालल्या आहे. त्यात चंडोलसारख्या छोट्या व अनाकर्षक पक्ष्यांची तर गोष्टच निराळी. याला जबाबदार केवळ राजकीय अनास्थाच नाही तर आपणसुद्धा आहोत. मानव समाजासोबत पक्ष्यांना पण आरक्षण मिळायलाच हवे. त्यासाठी औद्योगीकरण, राजकारण, विविध विकास व आपली जीवनशैली पर्यावरणपूरक करणे गरजेचे झाले आहे.

– किरण मोरे
kiranmorey1983@gmail.com

# गरुडाच्या घरट्यात वाढले ससाण्याचे पिल्लू

या वर्षीच्या मे महिन्यात ब्रिटिश कोलंबियातील शोल हार्बर पक्षी अभारण्यात शास्त्रज्ञ फिरत असताना त्यांना एक अद्‌भुत दृश्य दिसले. एका बाल्ड ईगल पक्ष्याच्या घरट्यात नरमादीच्या जोडीसोबत त्यांची तीन पिल्ले व दोन ससाण्याची पिल्ले ! त्या घरट्यात गरुड पक्ष्याचा संसार गेली २६ वर्षे चालू होता. दर वर्षी त्यांना दोन ते तीन पिल्ले होत असत. काही दिवसांनी ससाण्याचे एक पिलू दिसेनासे झाले.

गरुड जोडी दरवर्षी २ ते ३ पिलांना जन्म देते. या पिलांची भूक जबरदस्त असते. त्यामुळे त्यांची पोटे भरताना आईबापाची त्रेधा उडते. अपुऱ्या पोषणामुळे पुष्कळदा एक पिल्लू जगू शकत नाही. असे असतानाही ही जोडी आपल्या तीन पिलांबरोबरच पाहुण्या ससाण्याच्या दोन पिलांना का व कसे पोसत होती ?

या संदर्भात शास्त्रज्ञांनी काही अंदाज बांधले होते. पहिला म्हणजे गरुडाने ससाण्याच्या घरट्यावर हल्ला करून ती पिल्ले आपल्या पिल्लांकरता खाद्य म्हणून पळवली असतील. आपल्या घरट्यात त्यांना आणल्यावर त्यांचा भुकेसाठीचा आक्रोश पाहून त्यांचे मातृहृदय कळवळले असेल व त्यांना भरवून आपल्या पिलांसमवेत वाढवले असेल. गरुड आपल्या पिलांसाठी जिवंत भक्ष्य आणणे सामान्य आहे. हॅनकॉक वाइल्ड लाइफ फाऊंडेशनच्या डेव्हिड हॅनकॉक यांनी तीन वेळा असला प्रकार पाहिला होता. एका पिल्लाला पायात जखडून आणताना त्या पिल्लाला नखे रुतल्यामुळे दुखापत झाली असेल. काही दिवसांनी जखम चिघळल्याने वा जंतुसंसर्गामुळे ते पिल्लू मेले असावे.

दुसरा अंदाज असा : ससाण्याने गरुडाच्या तयार घरट्यात आपली अंडी घातली असावीत.



डोन्ना रँडल यांनी गरुडाच्या घरट्याजवळ घुटमळणारा ससाणा बरेच वेळा पाहिला होता. इतकेच नव्हे तर तिच्या नवऱ्याने थेट गरुडाच्या घरट्यावर मे महिन्यात बसलेला ससाणा पाहिला होता. वास्तविक ते ठिकाण ससाण्याच्या हद्दीत मोडत नव्हते. वसंत ऋतूत त्या अभयारण्यात वादळ होऊन अनेक मोठी झाडे पडली होती. त्यात ससाण्याचे घरटे कोसळले असण्याची शक्यता होती. अशा परिस्थितीत ससाण्याने गरुडाच्या घरट्यात अंडी घातली असतील.

गरुडाच्या घरट्यात वाढलेल्या ससाण्याच्या पिल्लाने २३ जूनला घरट्याबाहेर झेप घेतली. त्याचे नामकरण शास्त्रज्ञांनी 'स्पकी' असे केले होते. अधूनमधून स्पकी गरुडाच्या घरट्यात परत येऊन अन्नाची मागणी करीत असे. आईबाबांनी अन्न आणले की ते आपल्याला मिळावे म्हणून पिल्ले आक्रमक असतात. अशा पिलांशी झगडत त्यांच्याहून आकाराने लहान असणारा स्पकी खाद्य मिळवत होता म्हणजे वस्तादच म्हटला पाहिजे.

(Bird Watching वरून)

# सफर-सातपुडा टायगर रिझर्व्हची

*पान ९ वरून...*

एकमेकाजवळ उभे राहून हितगुज करताना पाहिले. इतका प्रचंड मोठा प्राणी पण तो अतिशय नाजूक शीळ घातल्यासारखा आवाज काढून एकमेकांशी संपर्क ठेवत असल्याचे लक्षात आले.

आमची शेवटच्या दिवशी सकाळी नदीतून boat ride होती. त्या वेळी आम्हाला Pied-Kingfisher जोडी दिसली. त्यांची नदीकाठच्या मातीत केलेली घरटी दिसली. तिथल्या काठावर नदी सुरयने केलेली घरटी व त्यांची गोंडस लुटुलुटू चालणारी पिल्लेपण दिसली. आमची बोट काठाजवळ यायला लागल्यावर नदीसुरय नर-मादी दोघेही आमच्या डोक्यावर हल्ला केल्यासारखे उडत ओरडत आले.

नदीच्या काठावरील गवतात आम्ही प्रथमच Thick-knee नावाचा Fish-eagle, Oriental honey-buzzard, Wooly-necked stork, Open-billed stork इ. पक्षी बघितले. चितळांचे कळप सकाळी पाणी पिण्यासाठी नदीकाठी आले होते. नदीत मगरी व पिल्ले होती. आमचा मार्गदर्शक आम्हाला दाखवत होता, पण आम्ही बघू शकलो नाही. वन्यजीवांनी समृद्ध कमी गर्दीचे मोठे जंगल मनसोक्त बघून खूप समाधानाने आम्ही पुण्याला परतलो.

– नीला मालेगावकर

पुणे. दूरध्वनी– ०२०-२४२१३२७९

# कॉर्बेट अभयारण्यातील नाचण

*पान ४ वरून...*

गेल्यासारखे वाटते. आमच्या या निसर्गभेटीत त्या महान शिकारी, सफेद साधू व निसर्गप्रेमी जिम कॉर्बेटचे जीवन कसे होते याचा काही अंशी अनुभव देणाऱ्या सुवर्णसंधीचा पुरेपूर फायदा घेतला. त्या अभयारण्यात अनेक रहस्ये आजही दडलेली आहेत. ते अनुभव घेण्यासाठी पुन्हापुन्हा येण्याचे आमंत्रण देत होते.

– विनोद भागवत

(मोबा. – ९४२२२३८५२३, Email : bhagwatvr@gmail.com)

# मलेशियामधील सातवी आंतरराष्ट्रीय हॉर्नबिल परिषद

हार्नबिल अगदी कुणालाही सहज ओळखता येणारी पक्षी प्रजाती, लांब खाली वाकलेली चोच, अन् चोचीवर शिंगासारखा वाढलेला भाग (Casque) असं याचं वेगळंच रूप. काही प्रजातींमध्ये हे शिंग विविध आकारात बरेच मोठे वाढलेले असते. आकाराने मध्यम ते मोठ्या आकाराचे हे पक्षी इतर पक्ष्यांप्रमाणे उत्क्रांती न झालेले किंवा परिस्थितीनरूप जुळवून न घेऊ शकल्यामुळे बदलले नाहीत. म्हणूनच आजही 'जुन्या काळातील' म्हणून ओळखले जातात. त्यांचा पृथ्वीतलावरील आढळ हा जुन्या जगात (so called old world) म्हणजेच आफ्रिका व आशिया खंडात सीमित आहे. या पक्ष्याला आजही जुन्या जंगलातील जुनी झाडं खाद्यासाठी अन् मोठाल्या झाडातील ढोली ह्या घरटे करण्यासाठी लागतात. विणीच्या हंगामात मादी पक्षी घरट्याच्या ढोलीत स्वतःला दोन महिन्यापर्यंत कोंडून घेते व तेथे अंडी देऊन पिल्ले मोठी होईपर्यंत आपली सारी पिसं गाळून आतच कोंडून राहते. या काळात ढोलीच्या बारीक फटीतून नर पक्षी मादीला खाद्य पुरवितो. अशी मजेशीर जन्मकथा असलेल्या या पक्ष्याच्या आज जगभरात आढळणाऱ्या एकूण ५७ प्रजातींपैकी जवळपास ३२ प्रजाती ह्या आशिया खंडात तर २५ प्रजाती ह्या दक्षिण आफ्रिकेमधील देशात सापडतात. भारतात यांपैकी ९ प्रजाती आढळत असून यांपैकी 'ग्रे हॉर्नबील (राखी धनेश)' हा पक्षी केवळ भारतातच आढळतो (endemic to india). महाराष्ट्रात हॉर्नबिलच्या एकूण चार प्रजाती आढळत असून यापैकी 'मलबार ग्रे हॉर्नबिल' हा प. घाटातच आढळतो (प. घाट प्रदेशनिष्ठ / Endemic to Western Ghat).

हॉर्नबिल पक्षी हा जंगलातील वृक्ष प्रजातींचा बीजप्रसार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत असून जंगलं वाढतात ती या पक्ष्यांमुळे. परंतु गेल्या शतकभरात शेतीसाठी, लाकडासाठी झालेली जंगलतोड व अलीकडे काही देशात चहा, कॉफी, रबर, पाम ची झाडं लावण्यासाठी साफ होत असलेली नैसर्गिक जंगलं, जुन्या झाडांची कत्तल व वणव्यामुळे जळणारी जुनी झाडे यामुळे या पक्ष्यांचे अधिवास मोठ्या प्रमाणात नष्ट झाले आहेत व अजूनही होत असल्यामुळे या पक्ष्यांच्या प्रजाती जगभरात झपाट्याने कमी होत आहेत. त्यांच्या संवर्धनाची गरज ओळखून त्यांचे संशोधन, संवर्धन करणाऱ्या जगभरातील हॉर्नबिल अभ्यासकांची चर्चा घडवून आणण्यासाठी हॉर्नबिल फाउंडेशनतर्फे दर चार वर्षांनी आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले जाते. यावर्षीची सातवी आंतरराष्ट्रीय हॉर्नबिल परिषद, मलेशियातील सारावाक स्टेटच्या राजधानीचे शहर असलेल्या कुचींग येथे दि. १६ ते १८ मे २०१७ दरम्यान नुकतीच पार पडली, असून मलेशियाचा सारावाक फॉरेस्ट्री विभाग, हॉर्नबिल फाउंडेशन व युनिव्हर्सिटी ऑफ मलेशिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या परिषदेस हॉर्नबिल पक्षी प्रजातींचा आढळ असणाऱ्या आशिया व आफ्रिका खंडातील तब्बल १५ देशातील अभ्यासक व संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या संस्थांचे जवळपास १५० प्रतिनिधी सहभागी झाले होते. या परिषदेस भारतातून एकूण आठ अभ्यासक सहभागी झाले होते. यामध्ये पूर्वोत्तर राज्यांमध्ये हॉर्नबिल संवर्धन व संशोधनासाठी कार्य करणाऱ्या अपराजिता दत्ता व रोहित नानिवडेकर, दक्षिण भारत व प. घाटात हॉर्नबिल अभ्यास करणाऱ्या दिव्या मुदप्पा व पूजा पवार, SACON मधील संशोधक पी. बालसुब्रामणियम व विदर्भातातून आम्ही तिघे – डॉ. जयंत वडतकर, प्रा. डॉ. गजानन वाघ, अनिल पिंपळापुरे – सहभागी झालो होतो.

सारावाक हा प्रदेश मलेशिया या देशाचे एक राज्य असून, मलेशियाची मुख्य भूमी व क्वालालंपूरपासून साधारणतः हजार किमी अंतरावर असलेला व हॉर्नबिलचा प्रदेश (Land of Hornbills) अशी ओळख असलेला हा प्रदेश बोर्नेओ बेटावर सबाह व इंडोनेशिया या देशांना लागून उतरेकडील बाजूस वसलेला आहे. जगातलं तिसऱ्या मोठ्या आकाराचं असलेलं बोर्नेओ बेट म्हणजे उष्णकटीबंधीय सदाहरित वर्षावनांचा प्रदेश. नोव्हेंबर ते मार्च या मान्सूनच्या काळात येथे भरपूर पाऊस पडतो व वर्षभरसुद्धा अधूनमधून पाऊस पडतो. त्यामुळे येथील जैवविविधता अतिशय संपन्न अशी आहे. ओरांग उटाग, प्रोबोसीस मंकी व गिब्बन या माकडांच्या प्रजातींसह येथील पक्षी विविधता संपन्न अशी आहे. हॉर्नबिल हा येथील महत्त्वाचा पक्षी. सारावाकमध्ये हॉर्नबिलच्या आठ प्रजाती सापडतात. यातील 'रायनोसिरोस हॉर्नबिल' हा येथील संस्कृतीचा एक अविभाज्य घटक बनलेला आहे. याची प्रचीती आपणास कुचींग शहर असो की सारावाकमधील कुठल्याही ठिकाणी वेळोवेळी येते.

कुचींगच्या छोटेखानी पण सुंदर अशा विमानतळावर उतरलो की तेथूनच आपल्याला हॉर्नबिलच्या प्रतिकृती दिसू लागतात. कुचींगकडे जाणाऱ्या एका उड्डाणपुलाच्या कडेला शंभरेक फूट उंचीचा रायनोसिरोस हॉर्नबिलचा पुतळा लक्ष वेधून घेतो. पुढे शहरात गेलो की चौकातील कारंजी असो की हॉटेलमधील लखलखणारे नक्षीकाम, ठिकठिकाणी हॉर्नबिल काढलेला. मार्केटमध्ये फिरताना रात्री रस्त्यावर विद्युत दिव्यांच्या रोषणाईमध्ये लखलखणारे हॉर्नबिल, टी-शर्टवर, कीचेनवर, भेटवस्तूंवर – जिकडे तिकडे हॉर्नबिल. जहाजावर, बोटींवर, घरांच्या टोकावर, इतकंच काय तर त्यांच्या राजचिन्हातसुद्धा हॉर्नबिल. त्यांच्या पारंपरिक कलाकुसरीत लाकडात कोरलेले हॉर्नबिल दिसतात. अशा या निसर्गसंपन्न व हॉर्नबिलप्रेमी प्रदेशाची राजधानी असलेले कुचींग हे शहर सारावाक या नदीकिनारी वसलेलं एक टुमदार, स्वच्छ व आतिथ्यशील असं गाव असून या शहराची ओळख 'कॅट सिटी' अशी आहे. स्थानिक भाषेत कुचींग म्हणजे मांजर, म्हणून 'कॅट सिटी'. या शहरात भटकी कुत्री, गाय, पाळीव प्राणी आम्हाला ४-५ दिवसात कधीही दिसले नाहीत, मांजरी अन मांजरीचे पुतळे मात्र भरपूर दिसले. अख्ख्या कुचींग जिल्ह्याची लोकसंख्या अवघी सव्वातीन लाख. मात्र या शहरात पंचतारांकित हॉटेलपासून ते डॉलर एक्सचेंजपर्यंत सारी व्यवस्था. साऱ्या

पान १३ वर...

पान १२ वरून...

शहरभर चढ-उताराचे नागमोडी रस्ते. यावरून गाड्या सुसाट धावतात. मात्र सिग्नलवर व झेब्रा क्रॉसिंगवर कुणी असो वा नसो, गाड्या थांबणार म्हणजे थांबणारच. ४-५ दिवसात आम्ही गाडीचा हॉर्न कधीही ऐकला नाही, अन् विशेष म्हणजे कुठेही ट्रॅफिक पोलीस नाही. अशा या सुंदर व निसर्गसंपन्न शहरात आम्ही परिषदेच्या आदल्या दिवशी दुपारीच पोहोचलो. येथील आमचा मुक्काम 'हार्बर व्ह्यू' या सारावाक नदीकिनारी वसलेल्या सुंदर अशा हॉटेलमध्ये होता. हॉटेलच्या आमच्या आठव्या मजल्यावरील खोलीतून नदीचे सुंदर दृश्य, नदीकाठचा चौपाटीसारखा रस्ता, त्या बाजूनेच जाणारा व हिरवळीने वेढलेला नागमोडी वाहनांचा रस्ता असे दृश्य अतिशय सुंदर दिसत होते. हॉटेलसमोरच सर्वात जुने चायनीज टेम्पल व चायनीज म्युझियम होते. परिषदेचे ठिकाण असलेलं हॉटेल रिव्हरसाइड मॅजिस्टीक हे तेथून अवघ्या २ मिनिटाच्या अंतरावर. सायंकाळी जेवायला बाहेर पडलो तेव्हाच परिषदेचे ठिकाण पाहून ठेवले.

परिषदेचे पुढचे तीन दिवस अत्यंत व्यस्त असे होते. दि. १६ ला पहिल्या दिवशी सकाळी ८ वा. नोंदणी व ९ ते १० उद्घाटनापासून सुरु झालेली परिषद पुढचे तीन दिवस रोज सायं. ६ पर्यंत सादरीकरणे चालायची. उद्घाटनाचा कार्यक्रम अतिशय सुटसुटीत, व पारंपरिक पद्धतीने, लांब बांबूच्या नळीतून बलूनवर तीर मारून करण्यात आली. मोजकी भाषणं अन् त्यानंतर मुख्य भाषण, हॉर्नबिल संवर्धनात गेल्या वर्षापासून कार्यरत असलेल्या व थायलंड हॉर्नबिल फाउंडेशनच्या माध्यमातून जगभरातील हॉर्नबिल संशोधकांना या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या माध्यमातून एकत्र आणणाऱ्या व ज्या बाईला जगभरात हॉर्नबिलची माता (Great Mother of Hornbill) म्हणून ओळखले जाते त्या प्रोफेसर पिलाई पुनस्वाद यांचे होते. त्यानंतरच्या सत्रातील मुख्य सादरीकरणामध्ये भारतातील नावाजलेल्या हॉर्नबिल संशोधक व संरक्षक अपराजिता दत्ता, आफ्रिकेतील ज्येष्ठ हॉर्नबिल संशोधक एलेन केम्प यांची मुलगी ल्युसी केम्प, मलेशियाचा येप चीन व थायलंडचे डॉ. विजाक या अनुभवी अभ्यासकांचा समावेश होता. या परिषदेमध्ये हॉर्नबिलचा आढळ असणारे देश व संवर्धनाची नितांत गरज असलेले आशिया खंडातील थायलंड, मलेशिया, इंडोनेशिया, भारत, भूतान, श्रीलंका व द. आफ्रिका अशा एकूण १५ देशांचे एकूण १५० प्रतिनिधी व अभ्यासकांनी आपली हजेरी लावली होती. त्यापैकी जवळपास ३६ सादरीकरणे या तीन दिवसात झाली. या परिषदेचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व उपस्थित फक्त हॉर्नबिल संवर्धन, संशोधन व अभ्यास या एकाच विषयाभोवती जुळलेले. त्यामुळे इतर काही परिषदांप्रमाणे फक्त प्रमाणपत्रापुरती हजेरी लावणारे सहभागी येथे नसतात. येथील प्रत्येकजण प्रत्येक सादरीकरण ऐकण्यासाठी व त्यावर चर्चा करण्यासाठी उत्सुक असतो. विदर्भातातून आम्ही तिघे डॉ. जयंत वडतकर, प्रा. डॉ. गजानन वाघ व डॉ. अनिल पिंपळापुरे व हॉर्नबिलवर संशोधन करून आचार्य पदवी मिळविलेले डॉ. राजू कसंबे असे चौघेजण गेल्या १० वर्षांपासून विदर्भातील हॉर्नबिलवर अभ्यास करीत आहोत व त्यावर आधारित 'विदर्भातील हॉर्नबिल प्रजातींची सद्यःस्थिती व त्यांचा भौगोलिक विस्तार' व 'शहरातील ग्रे हॉर्नबिल पक्ष्याच्या विणीच्या हंगामातील खाद्य' या दोन विषयावर आमचे शोध निबंध मांडले. आम्ही या चळवळीमध्ये गेल्या आठ वर्षांपासून सक्रीय असून यापूर्वी २००९ मध्ये सिंगापूर येथील पाचव्या व २०१७ मध्ये फिलिपाईन्स येथील सहाव्या परिषदेमध्ये सुद्धा आपले संशोधन सादर केले होते.

परिषदेच्या तीन दिवसांमध्ये, सादरीकरणाशिवाय झालेल्या महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे पहिल्या दिवशी रात्री सारावाक संस्कृतीची ओळख करून देणाऱ्या पारंपरिक नृत्यासोबत स्वागतपर भोजन, शेवटच्या दिवशी तज्ज्ञ व सत्राध्यक्ष यांचे चर्चासत्र व संशोधन व संवर्धनासाठी झालेले काही महत्त्वपूर्ण ठराव व समारोपानंतर मतांग वाईल्डलाइफ सेंटरला झालेली भेट.

कुचींग शहरापासून ३५ कि. मी अंतरावर असलेले मतांग वाईल्डलाइफ सेंटर म्हणजे उष्णकटीबंधीय सदाहरित वर्षावन असलेले कुबाह राष्ट्रीय उद्यानामधील वनविभागाचा एक भाग. येथे ओरांग उटांग या दुर्मीळ जातीच्या माकडाचे संशोधन, नैसर्गिक प्रजनन व पुनर्वसन केंद्र आहे. शिवाय इतर प्राणी व हॉर्नबिल पक्ष्यासाठीसुद्धा बचाव व पुनर्वसन केंद्र आहे. लगतच्या जंगलात हॉर्नबिल संख्या वाढीसाठी वड,




पिंपळ ही खाद्य वनस्पती व काही घरटी करण्यास उपयोगात येणाऱ्या वृक्ष प्रजातींचे वृक्षारोपण कार्यक्रम राबविला जातो; त्याला ते 'फिग गार्डन प्रकल्प' म्हणतात. ७२ चौ.किमीच्या या फिग गार्डन मध्ये त्यांनी आमच्या सर्वांच्या हाताने प्रत्येकी एक झाड लावून घेतले. त्यानंतर या सेंटरमधील ओरांग उटांग व इतर केंद्राला भेटी व जंगलभ्रमण असा कार्यक्रम आखला होता. येथे अनेक ओरांग उटांग जवळून पाहता आलेत. उष्णकटीबंधीय सदाहरित वर्षावन काय असते; हे त्या दिवशी शरीरातून निघालेल्या घामावरून कळले. येथील जंगल अनुभवता आले, काही पिंजऱ्यात ठेवलेले हॉर्नबिल व जंगलातील पक्षीसुद्धा पाहता आले.

या परिषदेदरम्यान आम्हाला जगभरात सुरू असलेले हॉर्नबिल

पान १४ वर...

अभिनंदन -

## मानद वन्य जीवरक्षक

महाराष्ट्र शासनाने राज्यातील ३२ जिल्ह्यात एकंदर ४७ मानद वन्यजीव रक्षकांची नियुक्ती केली आहे. काही जिल्ह्यात २ तर काही जिल्ह्यात ३ वा ४ जणांच्या नेमणुका केल्या आहेत. त्यात आपल्या खालील पक्षीमित्रांचा समावेश आहे. त्यांचे अभिनंदन करत असताना विशेष आनंद होत आहे.

सर्वश्री अनुज खरे, किरण पुरंदरे (पुणे जिल्हा), निनाद शहा (सोलापूर), डॉ. रमजान विराणी (यवतमाळ), राजकमल जोब (भंडारा) मुकुंद धुर्वे (गोंदिया), डॉ. सुधाकर कुऱ्हाडे (अहमदनगर), डॉ. जयंत वडतकर (अमरावती), डॉ. दिलीप यार्दी (औरंगाबाद), पी. एम. व्यवहारे (धुळे), नागेश शरद दप्तरदार (सिंधुदुर्ग), डॉ. रोहन भाटे (शाह), सातारा.

## माळढोक कृत्रिम प्रजनन केंद्र

राजस्थानमधील सॉरसन आणि मोरवला येथे माळढोक कृत्रिम प्रजनन केंद्र स्थापन करण्याचे निश्चित झाले आहे. केंद्रीय पर्यावरण वन मंत्रालयाने त्यासाठी ३३.८५ कोटी रुपयांची मंजुरी दिली आहे.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

महाराष्ट्र पक्षीमित्र, नागपूर या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २५ नोव्हेंबर २०१७ रोजी संध्याकाळी ५:०० वाजता, गडकरी रंगायतन, ठाणे येथे ३१ व्या महाराष्ट्र राज्य पक्षीमित्र संमेलनात घेण्यात येणार आहे. तरी संस्थेच्या सर्व आजीव सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे.

सभेपुढील कामे -

१) मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) संस्थेचा मागील वर्षीचा (२०१६-२०१७) जमाखर्च, अहवाल व ताळेबंद यास मंजुरी देणे.
३) आगामी वर्षभरातील (२०१८-२०१९) कार्यक्रमांची रूपरेषा ठरवणे.
४) सन २०१८-२०१९ ते २०२०-२०२१ कालावधीसाठी संस्थेचे मा.अध्यक्ष व १० कार्यकारी सदस्य यांची निवड करणे.
५) सन २०१८-२०१९ सालच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
६) सन २०१८-२०१९ सालासाठी अंतर्गत हिशेब तपासनीस ठरवणे.
७) मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

आपला विश्वासू,
(भाऊ काटदरे)
अध्यक्ष.

ठिकाण- चिपळूण. दिनांक- ०१/१०/२०१७

सूचना : गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास अध्यक्ष सभेच्या नियोजित वेळेनंतर त्या सभेच्या कामास अर्ध्या तासांनी सुरुवात करतील. अशा सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही आणि मूळ सभेपुढे विचारासाठी आलेल्या सर्व कामांचा विचार करण्यात येईल.

Registered with the Registrar of Newspaper in India under serial No. MAHMAR/2012/51349

**Book Packet containing periodicals**

प्रती,

प्रेषक :
महाराष्ट्र पक्षीमित्र
११, युनायटेड पार्क, मार्कंडी,
चिपळूण, जि.रत्नागिरी - ४१५ ६०५
फोन : (०२३५५) २५३०३०
E-mail : *pakshimitra@gmail.com*
*website : www.pakshimitra.org*

**पक्षीमित्र**
संपादक : दिगंबर गाडगीळ
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही
अक्षरजुळणी : प्रिंटवेब, नाशिक
मुद्रक : एस्. व्ही. प्रेस - चिपळूण
फोन : (०२३५५) २५२३३०